# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विद्याशाखेअंतर्गत 'इतिहास' विषयातील पीएच्.डी.पदवीकरिता सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा**

# "धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक"


**संशोधक**

**बोंडारे अनिता बबनराव**

एम.ए. (इतिहास)

नांदेड

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ.काशीनाथ निवृत्तीराव चव्हाण**

एम.ए., पीएच्.डी.

सहाय्यक प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक

इतिहास विभाग

श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत, जि.हिंगोली

**संशोधन केंद्र**

**नुतन महाविद्यालय, सेलू, जि.परभणी**


**एप्रिल २०२२**

-----------------------------------------------------------------------------------


०.१ प्रस्तावना

०.२ संशोधनाची आवश्यकता

०.३ संशोधन विषयाचे महत्त्व

०.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये

०.५ संशोधनाची गृहितके

०.६ पूर्व संशोधनाचा आढावा

०.७ संशोधनाची परिकल्पना

०.८ संशोधन पद्धती

०.९ संशोधन आराखडा

०.१० संशोधन मुलाखती

०.११ नमूना निवड

०.१२ संशोधनाची मर्यादा

०.१३ प्रकरणाची रूपरेषा

०.१४ संदर्भसूची


-----------------------------------------------------------------------------------

# "धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक"

## प्रस्तावना :-

भारतात प्राचीन काळात स्त्रियासंदर्भात विविध समस्या व बंधने होती. भारतातील धार्मिक ग्रंथात स्त्रियांना दुय्यम लेखून त्यांच्यावर विविध बंधने लादण्यात आली. कालांतराने या बंधनाविरूद्ध विविध धर्मसुधारकांनी आवाज उठविला. समाजात बालविवाह, सतीप्रथा, बहुपत्नीत्त्व, जरठविवाह, केशवपण, हुंडापद्धती, विधवा स्त्रिया इत्यादी बंधने स्त्रियांच्या विकासात अडथळा ठरत होती. त्याकरिता राजा राममोहन रॉय यांनी सर्वप्रथम महिला सुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणाला चालना दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समता प्रस्थापित केली. तसेच धोंडो केशव कर्वे यांनी देखील स्त्री उद्धारासंदर्भात कार्य केले.

समाजव्यवस्थेत स्त्रियांना अतिशय हीन दर्जा होता. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे अशी समजूत तत्कालीन समाजात रूढ होती. स्त्री पुरुषांपेक्षा कनिष्ठ असून तिचे कार्य चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित मानले जात होते. स्त्री ही कुटुंबाचा घटक आहे, ती पतीची अर्धांगिनी आहे असे मानले जात होते, परंतु प्रत्यक्षात स्त्रियांची अवस्था शोचनीय होती. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता, त्यांनी शिक्षण घेतल्यास त्या आणि शिक्षणसुद्धा भ्रष्ट होते अशी कल्पना समाजात रूढ होती.

समाजात जरठ विवाह प्रचलित होता. त्यामुळे बालविधवांची संख्या वाढत असे. अशा विधवांना पतीच्या निधनानंतर एक तर सती जावे लागे, नाहीतर वाईट अवस्थेत जीवन जगावे लागे. समाजात विधवांची संख्या भरपूर होती. त्यांनी केशवपण केले पाहिजे अशी सक्ती होती. त्यांना चांगले कपडे घालण्याची व समारंभात फिरण्याची परवानगी नव्हती. अशा

विधवांना परमार्थ साधनेतच आयुष्य घालवावे लागे. एखाद्याप्रसंगी विधवा स्त्रीचे पाऊल वाकडे पडले तर तिला समाजाकडून शिक्षा केली जात असे. अशा अत्यंत बिकट परिस्थितीत स्त्रियांच्या उद्धाराचे, त्यांचे दु:ख निवारण्याचे काम १९ व्या शतकातील महात्मा ज्योतिबा फुले, लोकहितवादी, विठ्ठल रामजी शिंदे, महर्षि धोंडो केशव कर्वे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज इत्यादी अनेक समाजसुधारकांनी केले. महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणाचे महत्त्व ओळखून ऑगस्ट १८४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेत असलेल्या तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिला विद्यापीठाची ३ जून १९१६ मध्ये स्थापना करून स्त्रियांना प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र, पाककला, चित्रकला, गायनकला इत्यादी कलेमध्ये निपूण बनविले.

"धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक" या शोध आराखड्याचा सारांशरूपाने अभ्यास करत असताना १९ व्या शतकातील स्त्रीने महाराष्ट्रातील सर्व धर्मामध्ये जोपासलेल्या रूढी-परंपरा यामुळेच धर्माचा प्रसार घडून आला. साहजिकच, त्याला धर्माची तत्त्वे, कल्पना, रूढी-परंपरा, आचार-विचार यांच्या जोखडात शतकानुशतके स्त्रिया अडकल्या. १३ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंत संत स्त्रियांचे वाङ्मयीन ऐतिहासिक योगदान महत्त्वाचे ठरते. तात्पर्य, विषयाला अनुरूप "धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक" या अनुषंगाने त्याचा अभ्यास करणे चिकित्सक ठरेल.

अशाप्रकारे वरील धर्मसुधारकांच्या चळवळीने १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील धार्मिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिमाण दिले. याचा अभ्यास आपण "धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक" या संशोधन विषयाच्या माध्यमातून करणार आहोत.

## संशोधनाची आवश्यकता :-

"धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक" या संशोधन विषयाच्या चिकित्सक अभ्यासाला सुरुवात करण्यापूर्वी या अभ्यासाची गरज प्रतिपादन करणे महत्त्वाचे ठरते.

स्त्री धर्मसुधारकांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य हा एकोणिसाव्या शतकातील एक शैक्षणिक लढा मानला जातो. या लढ्यात धर्मसुधारकांनी स्वतःचे 'सत्व' आणि 'स्वत्व' पणाला लावून हा लढा जिंकला आहे. म्हणजेच स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यात त्यांना यश आले आहे.

"धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक" याचा अभ्यास करत असताना १९ व्या शतकात स्त्रियांची शैक्षणिक परिस्थिती कशी होती? समाजाचा त्यांच्या शिक्षणाविषयी दृष्टिकोन कसा होता? धर्मसुधारकांच्या शैक्षणिक लढ्याला समाजाने कसा प्रतिसाद दिला? कोणकोणत्या धर्मसुधारकांनी स्त्री शिक्षणाविषयी मोलाचे योगदान दिलेले आहे? इ. बाबींचा संशोधनात्मक अभ्यास करणे हा हेतू किंवा उद्देश आहे. प्रस्तुत संशोधन विषयाच्या माध्यमातून अत्यंत समर्पकपणे संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## संशोधन विषयाचे महत्त्व :-

१९ व्या शतकातील स्त्रियांची शेक्षणिक परिस्थिती सुधारण्यासाठी जो शैक्षणिक लढा उभारला, समाजातील विविध घटकांशी वैर पत्करून स्त्री शिक्षण सुधारण्यासाठी जे शौर्य दाखविले. त्या सर्व धर्मसुधाकरांच्या कर्तृत्त्वाचा, कार्याचा इतिहास संशोधन रूपाने मांडणे हे संशोधन विषयाचे महत्त्व आहे.

प्रस्तुत संशोधनात १९ व्या शतकातील स्त्रियांच्या सुधारणेच्या संदर्भात संशोधन करत असताना सर्व धर्मसुधारकांनी जात, धर्म, भाषा इ. भेद न पाळता समाजातील रूढी परंपरेविरूद्ध लढा दिला. धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांच्या कार्याचे पृथक योगदान स्पष्ट करून त्यांची मीमांसा करणे महत्त्वाचे असल्याने हा विषय संशोधन कार्यासाठी घेतला आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

"धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक" या प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधनाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे विशद करण्यात आलेले आहेत.

१) १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील धर्मसुधारकांच्या स्त्री सुधारणाविषयक कार्यांचा अभ्यास करणे.

२) धर्मसुधारकांच्या स्त्री सुधारणाविषयक कार्याचा चिकित्सक अभ्यास करून नवीन माहिती प्रकाशात आणणे.

३) १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील धर्मसुधारकांच्या कार्यात्ील सहभागामध्ये तत्कालीन सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक जीवनाचा अभ्यास करणे.

४) १९ व्या शतकातील महाराष्टातील स्त्री सुधारणाविषयक कार्यामध्ये धर्मसुधारकांचे योगदान मांडणे.

५) वैयक्तिक दैनंदिन जीवनापेक्षा सामाजिक सुधारणांप्रती प्रेरित होऊन स्त्री सुधारणाविषयक कार्यामध्ये झोकुन देणे हे धर्मसुधारकांच्या कार्यातून पटवून देणे.

६) १९ व्या शतकातील धर्मसुधारकांच्या कार्यातून आजच्या आधुनिक काळातील स्त्रियांवर झालेल्या परिणामांची चिकित्सा करणे.

## संशोधनाची गृहितके :-

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके लक्षात घेतली आहेत.

१) १९ व्या शतकातील स्त्री सुधारणाविषयक कार्यामध्ये धर्मसुधारकांचे योगदान लक्षणीय आहे.

२) धर्मसुधारकांनी स्त्रियांच्या पारंपरिक बंधनांविरूद्ध दिलेला लढा उल्लेखनीय आहे.

३) स्त्रियांच्या शैक्षणिक सुधारणा चळवळीमध्ये धर्मसुधारकांची भूमिका महत्त्वाची आहे.

४) १९ व्या शतकात महाराष्ट्रातील लोकहितवादी, महात्मा ज्योतिराव फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज इत्यादी धर्मसुधारकांच्या स्त्री सुधारणावादी लढ्याला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

५) १९ व्या शतकातील धर्मसुधारकांनी स्त्रियांच्या सुधारणा घडवून आणत असताना जगाच्या ज्ञानाचे दालन असणारी इंग्रजी भाषेचे शिक्षण देऊन स्त्रियांच्या आधुनिक वाटचालीची मांडणी करण्यात आली.

## पूर्व संशोधनाचा आढावा :-

"धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक" या विषयावर चिकित्सा करत असताना मी माझा पूर्व संशोधनाचा अनुभव या संशोधन कार्यामध्ये अभिप्रेत ठेवून चिकित्सक संशोधन करणार आहे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना निबंध स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, नियतकालिके यामध्ये संशोधनपर लिहिल्या गेलेले लेख याचा मला पूर्व अनुभव आहे. याचा फायदा माझ्या संशोधन कार्यात नक्कीच होणार आहे.

## संशोधनाची परिकल्पना :-

अखंड भारताच्या इतिहासात स्त्री धर्मसुधारकांमध्ये जसे राजा राममोहन रॉय, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडूरंग तर्खडकर यांचे कार्य सर्वज्ञ मानले जाते. तसेच एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रातील स्त्री धर्मसुधारकांमध्ये लोकहितवादी, महात्मा ज्योतिराव फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज इत्यादी धर्मसुधारकांच्या स्त्री सुधारणाविषयक कार्यांचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला जाणार आहे.

## संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन अभ्यासाच्या उद्देशानुसार द्वितीय तथ्यांचा वापर आवश्यक असल्यामुळे संशोधनात दोन्ही साधनांचा वापर करण्यात येणार असून, तथ्य संकलन केले जाणार आहे. त्यात काही निवडक स्त्रिया निवडून स्त्रियांच्या दर्जात, स्थितीत, कार्यात काय बदल झालेला आहे? हे जाणून घेण्यासाठी प्राथमिक साधनांमध्ये मुलाखत अनुसूचीचा अवलंब करण्यात येणार आहे.

## संशोधनाचा आराखडा :-

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी आराखड्याची आवश्यकता असते. त्याकरिता वर्णनात्मक संशोधन आराखडा योग्य समजून निवड केली आहे. सदरील विषयात स्त्रियांच्या दर्जात कोणता बदल झालेला आहे. या बाबीचे वर्णन करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा निश्चित केला आहे. ज्यावेळी संशोधन कार्याचा उद्देश व्यक्ती समूह किंवा स्थितीच्या वैशिष्ट्याचे व लक्षणाचे सविस्तररित्या वर्णन करणे हा असतो. तेव्हा अशा स्वरूपाच्या अध्ययनासाठी वर्णानात्मक संशोधनाचा आराखडा उपयुक्त ठरतो.

## संशोधन मुलाखती :-

इतिहासाच्या दृष्टिकोनातून कोणत्याही ऐतिहासिक घटनेची माहिती घेत असताना वस्तुनिष्ठता महत्त्वाची असते. त्याच दृष्टिकोनाने संशोधनाचाच एक भाग म्हणून नागरिकांच्या मुलाखत घेऊन त्या मुलाखतीतून विषयानुषंगाने येणाऱ्या माहितीची चिकित्सा करण्यासाठी ह्या मुलाखती उपयोगी पडणार आहेत.

## नमुना निवड :-

प्रस्तुत संशोधनासाठी १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील धर्म सुधारक घेतले असून याचे कार्यक्षेत्र विस्तृत असल्यामुळे या संशोधनात नमुना निवड चाचणी या तंत्राचा वापर केला आहे. एकोणिसाव्या शतकातील धर्मसुधारकांपैकी लोकहितवादी, महात्मा ज्योतिराव फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे इत्यादी धर्मसुधारकांची निवड करून अभ्यास केला जाईल तसेच नमुना निवड म्हणून काही निवडक स्त्रियांची देखील केली आहे.

## संशोधनाची मर्यादा :-

"धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक" हा विषय संशोधनासाठी निवडला असून धर्मसुधारकांच्या कार्यावर संशोधनाचे काम करत असताना काही मर्यादा येतात.

प्रस्तुत प्रबंध लेखनासाठी निवडलेल्या विषयाची मर्यादा लक्षात घेता अखंड भारतात १९ व्या शतकात अनेक सुधारकांनी स्त्री सुधारणाविषयक कार्य केलेले आहे. परंतु प्रस्तुत प्रबंधामध्ये सर्वच धर्मसुधारकांच्या कार्याचा या ठिकाणी उल्लेख करणे शक्य नाही. म्हणून शोध प्रबंधात "धर्मसुधारणा चळवळीमध्ये स्त्री सुधारकांचे कार्य : विशेष संदर्भ १९ वे शतक" हा विषय मांडत असताना संशोधन कार्यात मर्यादा येऊ शकतात याची मला जाणीव आहे.

## प्रकरणाची रूपरेषा :-

प्रस्तुत शोध प्रबंध हा एकूण सहा प्रकरणात विभागण्यात आलेला आहे. त्या प्रकरणाची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे.

**प्रकरण पहिले : महाराष्ट्रातील धार्मिक चळवळीची पार्श्वभूमी**

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रातील समाजात व धर्मात कनिष्ठ प्रथांचा शिरकाव झालेला होता. त्याचे पालन करणे हाच आपला धर्म असल्याची लोकांची समजूत होती. समाजाला अस्पृश्यता, जातीभेद, अज्ञान, निरक्षरता, अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, दारिद्र्य, सतीची चाल, बालविवाह, केशवपण, बाल विधवांचा प्रश्न, इत्यादी दोष प्रचलित होते. त्यामुळे समाजाची अधोगती झालेली होती. त्याबरोबरच स्त्रियांची परिस्थिती तर आणखीन बिकट होती. समाजात आणि कुटुंबात स्त्रियांचे स्थान आणि दर्जा अत्यंत खालावलेला होता. कुटुंबात त्यांना दुय्यम स्थान होते. पती आणि गृहप्रमुखाच्या परवानगीशिवाय त्यांना घराच्या बाहेर पडण्याची मूभा नव्हती. एकंदरीत त्यांना सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक स्वातंत्र्य नव्हते.

धर्मसुधारणा चळवळीमुळे स्त्रियांच्या जीवनामध्ये परिवर्तन होण्यास मदत झाली. लोकहितवादी, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा ज्योतिराव फुले, विठ्ठल रामजी शिंदे, इत्यादी अनेक धर्मसुधारकांनी स्त्रियांच्या स्थितीमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांना शिक्षण देण्यात येऊन त्यांना जागृत करण्याचा प्रयत्न केला. धर्मसुधारकांनी शैक्षणिक संस्था स्थापन करून शैक्षणिक विकासाला चालना दिली. थोडक्यात सांगायचे म्हणजेच धर्मसुधारणा चळवळीमुळे स्त्रियांचा उद्धार होण्यास मदत झाली.

**प्रकरण दुसरे : महाराष्ट्रातील स्त्रियांची स्थिती**

१९ व्या शतकात उदयास आलेल्या अनेक धर्मसुधारकांनी सर्वांगीण सुधारणांची गुरुकिल्ली म्हणून शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले. सर्वच धर्मसुधारकांनी स्त्रीविषयक

सुधारणाचा आग्रह धरला व त्यादृष्टीने यात प्रामुख्याने गोपाळ गणेश आगरकर, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, विष्णुबुवा ब्रह्मचारी, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, विठ्ठल रामजी शिंदे, पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजर्षी शाहू महाराज इत्यादी अनेक धर्मसुधारकांनी सुधारणा चळवळ सुरु केली. १९ व्या शतकातील धर्मसुधारकांचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेला आहे.

**प्रकरण तिसरे : महाराष्ट्रातील स्त्री समाजसुधारकांचे योगदान**

१९ व्या शतकामध्ये स्त्रियांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. कुटुंबात तसेच समाजात त्यांना दुय्यम स्थान होते. परंतु सुधारणा चळवळीतील धर्मसुधारकांच्या योगदानामुळे स्त्रियांच्या जीवनामध्ये परिवर्तन होण्यास मदत झाली. सर्वप्रथम महात्मा फुलेंनी १८४८ मध्ये भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु करून मुहूतमेढ रोवली. मुलींना शिकविण्यासाठी प्रथमतः आपल्या पत्नीला म्हणजेच सावित्रीबाई फुले यांना साक्षर बनवून त्यांची स्त्री शिक्षका म्हणून नेमणूक केली. स्त्रियांवरील अन्याय दूर होण्यासाठी समाजात पुर्नविवाहाची प्रथा रूढ झाली पाहिजे यासाठी त्यांनी चळवळ सुरू केली. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून त्यांनी त्याकाळी होते असलेल्या बालहत्त्येवर एकप्रकारे अटकाव आणला. सतीप्रथा बंदी, बाला-जरठविवाह अमान्य, बालविवाह अमान्य, केशवपण पद्धतीस विरोध, बहुपत्नीत्त्वाला विरोध आदी सामाजिक कायदे करून त्यांनी अनिष्ठ रूढी पंरपरेविरूद्ध आवाज उठवला. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिला विद्यापीठ स्थापन करून स्त्रियांना एकप्रकारे स्वावलंबी, स्वाभिमानी व स्वकर्तृत्त्ववान बनविण्याचा प्रयत्न केला. धर्मसुधारकांच्या समाजसुधारणेतील योगदानामुळे समाजात सकारात्मकतेचे वारे वाहू लागले.

**प्रकरण चौथे : महाराष्ट्रातील स्त्री सुधारक**

महाराष्ट्रातील स्त्री विषयक सुधारणा मांडणाऱ्या धर्मसुधारकांमध्ये प्रामुख्याने लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख), महात्मा ज्योतिराव फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, विठ्ठल

रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज इत्यादी धर्मसुधारकांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. तसेच सदरील सर्व धर्मसुधारकांच्या कार्याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे. स्त्रीविषयक सुधारणांची तूलनात्मक दृष्टिकोनातून चिकित्सा करण्यात येणार आहे.

**प्रकरण पाचवे : महाराष्ट्रातील स्त्री सुधारकांच्या कार्याचे परिणाम**

प्रस्तुत प्रकरणामधून महाराष्ट्रातील स्त्रियांवर सुधारणांचे जे काही सकारात्मक परिणाम झालेले आहेत त्याचा विस्तृत आढावा घेतलेला आहे. धर्मसुधारणा चळवळीमुळे स्त्रिया "चूल आणि मूल" इतक्या पुरत्याच मर्यादित न राहता शिक्षणप्रवाहात सामील होऊ लागल्या. स्त्रियांना समाजात सामाजिक, आर्थिक स्थैर्य प्राप्त होऊ लागले. याचाच परिणाम म्हणून आज स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा देऊन प्रत्येक क्षेत्रात अग्रस्थानी होऊ लागल्या आहेत.

अशाप्रकारे महाराष्ट्रातील स्त्रियांवर धर्मसुधारणांच्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे. आजच्या आधुनिक काळात महाराष्ट्रातील स्त्रियांवर सुधारणांचे झालेले सर्वस्तरातील परिणाम यांचा अभ्यास केला जाणार आहे.

**प्रकरण सहावे : उपसंहार आणि निष्कर्ष**

संशोधनाअंती प्रत्येक प्रकरणातील उपसंहार आणि त्याच्या निष्कर्षाची चिकित्सा करण्यात येईल.

**टीप : वरीलप्रमाणे प्रबंधाचा आराखडा असून, आवश्यकता भासल्यास काही बदल केले जाऊ शकतात.**

## संदर्भसूची :-


१. "जीवन शिक्षण", राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, नियतकालिक (मासिक)

२. सामुद्रे डॉ.संध्या, "उदयोन्मूख भारतीय समाजातील शिक्षण", मंगेश प्रकाशन, नागपूर.

३. कपाले अरविंद, "भारतीय समाज आणि शिक्षण", निराली प्रकाशन, पुणे.

४. सोनवणे डॉ.रंजना, "समकालीन भारतातील शिक्षण आणि लिंगभाव, विद्यालय व समाज", प्रशांत पब्लिकेशन, पुणे,

५. दुनाखे डॉ.अरविंद, "उदयोन्मूख भारतीय समाजातील शिक्षण", डायमंड पब्लिकेशन, पुणे.

६. पाटील डॉ.विनोद व्ही. "समकालीन भारतातील शिक्षण", अथर्व पब्लिकेशन, पुणे.

७. शिक्षणावर दृष्टिक्षेप : २०००-२००१, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८. फडकुले निर्मलकुमार, "महाराष्ट्राचे शिल्पकार लोकहितवादी", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ, मुंबई.

९. पांढरे डॉ.नीला, "महर्षी धोंडो केशव कर्वे"

१०. खोले विलास, "महर्षी धोंडो केशव कर्वे"

११. महात्मा फुले यांचे समग्र वाङ्मय

१२. शिंदे ताराबाई, "स्त्री-पुरुष तुलना"

१३. कीर धनंजय, "राजर्षी शाहू छत्रपती : एक समाज क्रांतिकारक राजा".

१४. नियतकालिके व वर्तमानपत्रे

    १. दैनिक गोदातीर

    २. दैनिक प्रजावाणी

३. दैनिक मराठवाडा

४. दैनिक लोकसत्ता

५. दैनिक सामना

६. Deccan Cronical

७. Indian Express

८. The Times of India

१५. मुलाखती

१६. प्रत्यक्ष स्थळांना भेटी

१७. www.shodhganga.com


**संशोधक**
**बोंडारे अनिता बबनराव**
**एम.ए. (इतिहास)**
**नांदेड**

**मार्गदर्शक**
**प्रा.डॉ.काशीनाथ निवृत्तीराव चव्हाण**
**एम.ए., पीएच्.डी.**
**सहाय्यक प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक**
**इतिहास विभाग**
**श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय,**
**वसमत, जि.हिंगोली.**